**रे.के.नं. १९०/२०२२**
**नि.क्र. ४९/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.१०** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | भुषण दिपक राउत |
| वय | - | ४० वर्षे |
| व्यवसाय | - | पोलिस हवालदार ब.क्र. ११२० |
| राहणार | - | पोलिस ठाणे न्हावाशेवा |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती शितल पवार यांच्यामार्फत...</u>**

१. घटनेच्यावेळी मी मोरा सागरी पोलिस ठाण्यात चालक पदावर कार्यरत होतो. त्यावेळी माझ्याकडे पीटर मोबाईल हे वाहन चालवण्यास होते. त्या वाहनाचा क्रमांक एम.एच.४३ जी ४८६ असा होता. माझी ड्युटी २४ तास स्वरूपाची होती. दिनांक २३.०३.२०२१ रोजी सकाळी ८.०० वाजता मी पोलिस ठाणे मोरा येथे आलो. तेंव्हा मला ठाणे अमंलदार यांनी एका गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपीला वैद्यकीय तपासणीसाठी घेउन जायचे आहे असे सांगितले. त्यामुळे तपास अधिकारी, आरोपी व स्टॉफ यांना मी त्या वाहनाने उरण येथील सरकारी दवाखान्यात नेले. वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर मी त्यांना पुन्हा पोलिस ठाण्यात वापस नेले. त्यानंतर तपास अधिका-यांनी सांगितले की, आरोपींनी ज्या ठिकाणी गाड्या जाळल्या ते ठिकाण आरोपी दाखवणार असून तेथे जायचे आहे. त्यामुळे दोन पंच, आरोपी , तपास अधिकारी व स्टाफ यांना घेउन मी त्या वाहनाने आरोपीने सांगितल्याने त्यांने

सांगितल्याप्रमाणे उरणच्या दिशेन गेलो. उरण येथे आल्यावर नरेंद्र ॲटो गॅरेज येथे आरोपीने थांबण्यास सांगितले. तसेच डोंगरावर जायचे असल्याचे त्याने सांगीतले व त्यामुळे गाडी मांगीरदेव झोपडपट्टीच्या जवळ मैदानात लावली. त्यानंतर आरोपीने आम्हां सर्वांना डोंगरावर पायी नेले. त्यानंतर आरोपीने ते ठिकाण दाखवले. त्यानंतर तपास अधिका-यांनी तेथे पंचनामा केला. त्यानंतर आम्ही पुन्हा गाडीकडे आलो व गाडीने पोलिस ठाण्यात आलो. मी गाडीच्या लॉगबुकची प्रत तपास अधिका-यांना दिली होती. मुळ प्रत गाडीत ठेवली जाते व बुक भरल्यावर मोटार परीवहन विभाग कळंबोली येथे पाठवली जाते. ज्या आरोपीने आम्हांला घटनास्थळावर नेले होते तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील रोशनी बारे यांच्याव्दारे सुरू</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणावर आरोपीने आम्हांला नेले होते ते मोकळे ठिकाण होते व तेथे कोणीही सहज येणेजाणे करू शकत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी जबाबामध्ये आरोपींची किंवा पंचांची नावे सांगितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. .

**उलटतपास संपला..**
**फेरतपास नाही..**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**उरण,** **(एस. पी. वानखडे)**

दिनांक – ०२/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

न्यायालय क्र. २